महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

---

# बायफ - मित्र संस्थेमार्फत आदिवासी कुटुंबांकरिता राबविण्यात आलेल्या जनउत्कर्ष - वाडी व सुधारित शेती कार्यक्रम योजनेचा मूल्यमापन अहवाल

---







आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

२८, क्वीन्स गार्डन, जुन्या सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११ ००१ महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्र. ०२०-२६३६२०७१, फॅक्स क्र. ०२०-२६३६००२६, ई-मेल-trti.mah@nic.in

# बायफ - मित्र संस्थेमार्फत आदिवासी कुटुंबांकरिता राबविण्यात आलेल्या जनउत्कर्ष - वाडी व सुधारित शेती कार्यक्रम योजनेचा मूल्यमापन अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, क्वीन्स गार्डन, जुन्या सर्कीट हाऊस जवळ, पुणे-४११ ००१ महाराष्ट्र राज्य

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा जीवनस्तर उंचावण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या लाभांचे आदिवासींची आर्थिक व सामाजिक स्थिती तसेच प्रगती व आरोग्य इत्यादींवर झालेला परिणाम व बदल याबाबतचे मूल्यमापन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करण्यात येते.

आदिवासींचा एकात्मिक विकास व्हावा म्हणून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १५ जिल्ह्यांमध्ये आदिवासी कुटुंबांकरीता जनउत्कर्ष कार्यक्रम बायफ विकास अनुसंधान प्रतिष्ठान, पुणे या संस्थेशी संलग्न असलेली महाराष्ट्र इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ट्रान्सफर फॉर रुरल एरियाज (मित्र), नाशिक या स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला.

सदर जनउत्कर्ष - वाडी व सुधारीत शेती कार्यक्रमाचे मूल्यमापन ए. क्षे. वि. का. कक्षामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. यासाठी रायगड, पुणे, नाशिक, नांदेड व यवतमाळ या ५-जिल्ह्यांत ९-तालुक्यांमधील ५३-गावांमध्ये ३४२ कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

सदर क्षेत्रीय मूल्यमापन पाहणीचे काम श्री. आर. एल. कोल्हार, संशोधन अधिकारी, श्री. एस. एस. धानोरकर, प्र. सांख्यिकी अधिकारी, श्री. ए. बी. हेमाडे, संशोधन सहाय्यक, श्री. यु. एम. यादव, आरेखक, श्री. सी. पी. देशमुख, उपलेखापाल, श्री. व्ही. एन. डगळे, सां. सहाय्यक, श्री. वाय. एस. चौधरी, अन्वेषक (व.) यांनी पूर्ण केले असून अंतिम अहवाल लेखनाचे काम श्रीमती पी. बी. पाटील, उपसंचालक, तत्कालीन एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम (ए.क्षे.वि.का.) यांचे मार्गदर्शनाखाली श्री. आर. एल. कोल्हार, संशोधन अधिकारी यांनी केले आहे. सदर अहवालाचे टंकलेखन व डी. टी. पी. चे काम श्री. वाय. एस. चौधरी, अन्वेषक (व.) यांनी पूर्ण केले आहे.

महाराष्ट्र इन्स्टीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ट्रान्सफर फॉर रुरल एरियाज (मित्र), नाशिक चे श्री. व्ही. वाय. देशपांडे, माजी मुख्य समन्वयक, श्री. एस. एम. वागळे, मुख्य समन्वयक तसेच श्री. व्ही. बी. द्यासा, मुख्य कार्यक्रम समन्वयक यांनी वाडी कार्यक्रम या योजनेची सविस्तर माहिती दिली. श्री. सुनील घुगे, विभागीय अधिकारी, जव्हार विभाग व त्यांचे सहकारी, श्री. राजू इंगळे, अतिरिक्त कार्यक्रम समन्वयक, नांदेड व यवतमाळ जिल्हा व त्यांचे सर्व सहकारी यांनी सर्वेक्षणासाठी सहकार्य केले. तसेच पुणे व नाशिक जिल्ह्याचे विभागीय अधिकारी श्री. जितीन साठे यांनी सर्वेक्षणासाठी पथकाला संपूर्ण वाडी कार्यक्रमाच्या मूल्यमापनाबाबत विशेष परिश्रम घेऊन सहकार्य केलेले आहे.

योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणी व त्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच आदिवासींसाठी योजनांची आखणी करताना, आदिवासींचा जीवनस्तर उंचावण्यासाठी व स्थलांतर रोखण्यासाठी तसेच आदिवासी जीवनाचा अभ्यास करणाऱ्या सर्वांना या अहवालाचा निश्चित उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे.

ठिकाण - पुणे.
दिनांक - १९/०८/२०१४

(एस. एम. सरकुंडे)
आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | जनउत्कर्ष कार्यक्रमांतर्गत वाडी कार्यक्रम व सुधारित शेती योजनेच्या मूल्यमापनाचा उद्देश | | १ |
| २ | कार्यपद्धती | | २ |
| ३ | पृथक्करण | | |
| | ३.१ | क्षेत्रीय पाहणी | ३ ते ५ |
| | ३.२ | लाभार्थ्यांकडे उपलब्ध असलेले सिंचन स्रोत | ६ ते ७ |
| | ३.३ | लाभधारकांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण | ८ |
| | ३.४ | लाभार्थ्यांचा शैक्षणिक स्तर | ९ ते १० |
| | ३.५ | लाभार्थ्यांकडे असलेले पशुधन | ११ ते १२ |
| | ३.६ | लाभार्थ्यांच्या घराची स्थिती | १३ ते १६ |
| | ३.७ | लाभार्थ्यांचे जमातनिहाय वर्गीकरण | १७ ते १८ |
| ४ | जनउत्कर्ष कार्यक्रमांतर्गत वाडी कार्यक्रम व सुधारित शेती योजनेचे विश्लेषण | | |
| | ४.१ | लाभार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या सहली, बैठका, चर्चासत्रे व प्रशिक्षण शिबिरे | १९ ते २० |
| | ४.२ | लाभार्थ्यांनी घेतलेली पिके | २१ ते २४ |
| | ४.३ | लाभार्थ्यांना वाटप केलेली फळरोपे | २५ ते ३० |
| | ४.४ | लाभार्थ्यांना वाटप केलेली वनरोपे | ३१ ते ३४ |
| | ४.५ | लाभार्थ्यांच्या मालकीच्या जमिनीची उत्पादनक्षमता व शेती साधनात झालेली वाढ | ३५ ते ३६ |
| | ४.६ | उत्पन्नविषयक माहिती | ३७ ते ४० |
| | ४.७ | स्थलांतर व योजनेचा फायदा याबाबतची माहिती | ४१ ते ४४ |
| ५ | निष्कर्ष | | ४५ ते ४६ |
| ६ | योजना राबविण्यातील अडचणी व उपाययोजना | | ४७ ते ४९ |

# प्रकरण क्रमांक - १

## जनउत्कर्ष कार्यक्रमांतर्गत वाडी कार्यक्रम व सुधारित शेती कार्यक्रम या योजनेच्या मूल्यमापनाचे उद्देश

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्र हे प्रामुख्याने डोंगराळ व दुर्गम भागात आहे. आदिवासींची उपजीविका प्रामुख्याने शेती, गौण वनौपज यांवर अवलंबून आहे. रोजगाराची व शाश्वत उत्पन्नाची कमतरता असल्यामुळे आदिवासींमध्ये रोजगारासाठी तसेच उपजीविकेसाठी स्थलांतर करण्याचे प्रमाण जास्त आहे. आदिवासींच्या शेती करण्याच्या पद्धतीसुद्धा पारंपरिक असल्यामुळे उत्पन्नाचे प्रमाण सुद्धा अत्यंत कमी आहे. आदिवासींचे जीवनमान उंचावणे तसेच त्यांच्या आर्थिक, कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीमध्ये प्रगतीकारक बदल घडवून आणण्याचे उद्देशाने महाराष्ट्र शासनाने बायफ-मित्र या स्वयंसेवी संस्थेमार्फत महाराष्ट्राच्या आदिवासी क्षेत्रामध्ये जनउत्कर्ष कार्यक्रमांतर्गत वाडी कार्यक्रम व सुधारीत शेती कार्यक्रम आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक कृषिवि-२००३/प्र.क्र.८५/का-९, दिनांक १७/०८/२००४अन्वये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर वाडी कार्यक्रम राबविण्याचा उद्देश खालील प्रमाणे होता -

१) आदिवासी कुटुंबांना शाश्वत अर्थार्जनाचा पर्याय उपलब्ध करून देणे.

२) सुधारीत शेती करण्याच्या पद्धतींचा अवलंब करून शेतीचे उत्पादन व उत्पन्न वाढविणे.

३) आदिवासींचे जीवनमान उंचावणे व कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्याने आरोग्यात सुधारणा करणे.

४) आदिवासी कुटुंबांतील सर्वांना पोटभर अन्नाची शाश्वती व दारिद्र्य निर्मूलन

५) आदिवासींचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखणे.

६) एकूणच आदिवासी कुटुंबांच्या सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठेत वाढ करणे.

# प्रकरण क्रमांक - २

## कार्यपद्धती

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार बायफ - मित्र या स्वयंसेवी संस्थेमार्फत आदिवासी लाभार्थ्यांसाठी जनउत्कर्ष कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या वाडी कार्यक्रम व सुधारित शेती कार्यक्रम या योजनेचे मूल्यमापन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील ए.क्षे वि.का. कक्षाकडून रायगड, पुणे, नाशिक, नांदेड व यवतमाळ या ५ जिल्ह्यांत ९ तालुक्यांमधील ५३ गावांमध्ये ३४२ कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

सदर पाहणीचे काम या कार्यालयातील खालील पथकाकडून करण्यात आले.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | श्री. आर. एल. कोल्हार | संशोधन अधिकारी |
| २. | श्री. एस. एस. धानोरकर | प्र.सांख्यिकी अधिकारी |
| ३. | श्री. ए. बी. हेमाडे | संशोधन सहाय्यक |
| ४. | श्री. यु. एम. यादव | आरेखक |
| ५. | श्री. सी. पी. देशमुख | उपलेखापाल |
| ६. | श्री. व्ही. एन. डगळे | सांख्यिकी सहाय्यक |
| ७. | श्री. वाय. एस. चौधरी | अन्वेषक (व.) |

# प्रकरण क्रमांक -३

## पृथक्करण

### ३.१ क्षेत्रिय पाहणी

### क्षेत्रिय पाहणीसाठी निवडलेली गावे व कुटुंबे

जनउत्कर्ष - वाडी व सुधारीत शेती योजनेचे मूल्यमापनासाठी नेलेल्या पथकाने (१) रायगड (२) पुणे (३) नाशिक ४) नांदेड ५) यवतमाळ जिल्ह्यातील खाली दिल्याप्रमाणे ९ तालुक्यांतील ५३ गावांची पाहणी केली.

तक्ता क्र. २

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावे | कुटुंबे |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | रायगड | १) पेण | ४ | ५८ |
| | | २) कर्जत | २ | २० |
| | | **एकूण जिल्हा** | ६ | ७८ |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७ | ७७ |
| | | **एकूण जिल्हा** | ७ | ७७ |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | १० | ४२ |
| | | २) सुरगाणा | १० | ३८ |
| | | **एकूण जिल्हा** | २० | ८० |
| ४. | नांदेड | १) किनवट | २ | १४ |
| | | **एकूण जिल्हा** | २ | १४ |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ९ | ७४ |
| | | २) मारेगाव | ६ | १३ |
| | | ३) झरी-जामणी | ३ | ६ |
| | | **एकूण जिल्हा** | १८ | ९३ |
| | | **एकूण एकंदर** | ५३ | ३४२ |

## - जनउत्कर्ष कार्यक्रमाचे कार्यक्षेत्र -

| अ.क्र. | जिल्हा | तालुका |
|---|---|---|
| १ | ठाणे | जव्हार, विक्रमगड, पालघर, डहाणू, तलासरी, शहापूर, मुरबाड |
| २ | रायगड | पेण, कर्जत |
| ३ | पुणे | आंबेगाव, जुन्नर |
| ४ | नाशिक | इगतपुरी, त्रंबकेश्वर, सुरगाणा |
| ५ | अहमदनगर | अकोले |
| ६ | नंदुरबार | धडगाव, अक्कलकुवा, तळोदा, नंदुरबार, नवापूर |
| ७ | धुळे | साक्री, शिरपूर |
| ८ | जळगाव | यावल, चोपडा, रावेर |
| ९ | यवतमाळ | राळेगाव, कळंब, पांढरकवडा, घाटंजी, मारेगाव, झरी जामणी |
| १० | नांदेड | किनवट |
| ११ | अमरावती | धारणी, चिखलदरा |
| १२ | नागपूर | रामटेक |
| १३ | चंद्रपूर | सिंदेवाही, जिवती, कोरपणा, पोंभूर्णा, राजूरा, चिमूर, नागभिड |
| १४ | गडचिरोली | कुरखेडा, धानोरा, कोरची, एटापल्ली, भामरागड, अहेरी |
| १५ | गोंदिया | देवरी, मोरगावअर्जुनी, सालेकसा |

१) जनउत्कर्ष कार्यक्रमाचे टप्पे - हा कार्यक्रम चार टप्प्यांमध्ये राबविण्यात आला.

१) पहिला टप्पा - सन २००४-०५

२) दुसरा टप्पा - सन २००५-०६

३) तिसरा टप्पा - सन २००७-०८

४) चौथा टप्पा - सन २००८-०९

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये वरील प्रमाणे चार टप्प्यांमध्ये जनउत्कर्ष कार्यक्रम राबविण्यात आला. चौथ्या टप्प्यामध्ये घेतलेली कामे पूर्ण करण्यास शासनाने ३१ मार्च, २०११ पर्यंत मुदतवाढ दिली. आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये निधी कमतरता असल्यामुळे नवीन सहभागी धारकांना लाभ देता आला नाही. जुन्या सहभागी धारकांना खते, पाण्याची सोय, देखभालीचा खर्च, इ. करता आलेला नाही. निधी अभावी वाडी कार्यक्रमाची अंमलबजावणी करता आली नाही, असे मत मित्र संस्थेचे अधिकारी / कर्मचारी यांनी व्यक्त केले. पाहणी केलेल्या ५ जिल्ह्यांमध्ये चार टप्प्यांत कामे पूर्ण झाली आहेत.

२) **पर्जन्यमानाचे प्रमाण** :- पाहणी केलेल्या ५ जिल्ह्यांमध्ये पर्जन्यमानाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हे | सरासरी पर्जन्यमान | संस्थेचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | रायगड | २३०० मिमी | सिंचनस्त्रोत चांगला उपलब्ध आहे. |
| २ | पुणे | २२०० ते ३००० मिमी | सिंचनस्त्रोत बऱ्यापैकी उपलब्ध आहे. कमी /जास्त उताराची जमीन असल्यामुळे पाणी वाहून जाते. जलसंधारण कामांचा अभाव निदर्शनास आला. |
| ३ | नाशिक | २००० ते २५०० मिमी | सिंचनस्त्रोत मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. |
| ४ | नांदेड | ९०० मिमी | सिंचनस्त्रोत अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. |
| ५ | यवतमाळ | ६९२ ते ९४६ मिमी | सिंचनस्त्रोत अत्यंत नगण्य प्रमाणात उपलब्ध आहे. |

## ३.२ लाभार्थ्यांकडे उपलब्ध असलेल्या सिंचन स्त्रोतांची माहिती

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांच्या सिंचन स्त्रोतांचा विचार केला असता खालील परिस्थिती आढळून आली.

### तक्ता क्र. ३

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | विहीर | नदी | नाला | तलाव | पाझर तलाव | विंधन विहीर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ४० | ० | ११ | ६ | ० | ० |
| | | २) कर्जत | २० | ५ | ५ | ३ | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ७८ | ४५ | ५ | १४ | ६ | ० | ० |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | १९ | ५ | १४ | ३ | १ | ० |
| | | एकूण जिल्हा | ७७ | १९ | ५ | १४ | ३ | १ | ० |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | १८ | ११ | ६ | १ | १० | ० |
| | | २) सुरगाणा | ३८ | १८ | ११ | ० | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ८० | ३६ | २२ | ६ | १ | १० | ० |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ३ | ० | ० | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | १४ | ३ | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | १ | ० | १ | २ | १ | ० |
| | | २) मारेगाव | १३ | २ | ० | ० | २ | ० | ० |
| | | ३) झरी-जामणी | ६ | ३ | ० | ० | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ९३ | ६ | ० | १ | ४ | १ | ० |
| | | एकूण एकंदर | ३४२ | १०९ | ३२ | ३५ | १४ | १२ | ० |

३.१ वरील तक्त्यावरुन असे आढळले की, पाहणी केलेल्या एकूण ३४२ लाभार्थ्यांपैकी २०२ म्हणजे ५९% लाभार्थ्यांकडे सिंचनस्त्रोत उपलब्ध आहे. त्यापैकी १०९ लाभार्थी म्हणजेच ५४% लाभार्थींकडे विहिरस्त्रोत उपलब्ध आहे. तर १६% म्हणजेच ३२ लाभार्थींकडे नदी स्त्रोत, तर १८% म्हणजेच ३५ लाभार्थींकडे नालास्त्रोत तसेच ६% म्हणजेच १४ लाभार्थींकडे तलाव स्त्रोत, तर ६% म्हणजेच १२ लाभार्थींकडे पाझर तलाव स्त्रोत उपलब्ध आहे.

३.२ रायगड जिल्ह्यात ७८ पैकी ७० म्हणजेच ९०% लाभार्थ्यांकडे सिंचन स्त्रोत उपलब्ध आहे. त्यापैकी ४५ लाभार्थी म्हणजेच ६४% लाभार्थी यांचेकडे विहीरस्त्रोत उपलब्ध आहे. तर उर्वरीत २५ लाभार्थी म्हणजेच ३६% कडे इतर सिंचन स्त्रोत उपलब्ध आहे. यावरुन असे आढळून येते की, सर्वेक्षणासाठी निवडण्यात आलेल्या तालुक्यांत सिंचन स्त्रोत चांगला उपलब्ध आहे.

३.३ पुणे जिल्ह्यात ७७ लाभार्थ्यांपैकी ४२ म्हणजेच ५५% लाभार्थ्यांकडे सिंचन स्त्रोत उपलब्ध आहे. त्यापैकी १९ म्हणजेच ४५% लाभार्थ्यांकडे विहीर सिंचन स्त्रोत, तर उर्वरीत २३ लाभार्थी म्हणजेच ५५% लाभार्थ्यांकडे नदी, नाला, तलाव व पाझर तलाव हे सिंचन स्त्रोत उपलब्ध आहेत. यावरुन असे आढळून येते की, पुणे जिल्ह्यातील सर्वेक्षणासाठी निवडण्यात आलेल्या तालुक्यांत सिंचन स्त्रोत बऱ्यापैकी उपलब्ध आहेत.

३.४ नाशिक जिल्ह्यात ८० लाभार्थ्यांपैकी ७५ म्हणजेच ९४% लाभार्थ्यांकडे सिंचन स्त्रोत उपलब्ध आहे. त्यापैकी ३६ म्हणजेच ४८% लाभार्थ्यांकडे विहीर सिंचन स्त्रोत उपलब्ध आहे. उर्वरीत ३९ म्हणजेच ५२% लाभार्थ्यांकडे नदी, नाला, तलाव व पाझर तलाव हे सिंचन स्त्रोत उपलब्ध आहेत. यावरुन असे आढळून येते की, नाशिक जिल्ह्यातील सर्वेक्षणासाठी निवडण्यात आलेल्या तालुक्यांत सिंचन स्त्रोत मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

३.५ नांदेड जिल्ह्यात १४ लाभार्थ्यांपैकी ३ म्हणजेच २१% लाभार्थ्यांकडे विहीर हा सिंचन स्त्रोत उपलब्ध आहे तर अन्य लाभार्थ्यांकडे सिंचन स्त्रोत उपलब्ध नाही. यावरुन असे आढळून येते की, नांदेड जिल्ह्यातील सर्वेक्षणासाठी निवडण्यात आलेल्या तालुक्यांत सिंचन स्त्रोत अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहेत.

३.६ यवतमाळ जिल्ह्यात ९३ लाभार्थ्यांपैकी १२ म्हणजेच १३% कडे सिंचन स्त्रोत उपलब्ध आहेत. ६ म्हणजेच ५०% लाभार्थ्यांकडे विहीर हा सिंचन स्त्रोत उपलब्ध आहे तर उर्वरीत ६ म्हणजेच ५०% लाभार्थ्यांकडे नाला, तलाव व पाझर तलाव हे सिंचन स्त्रोत उपलब्ध आहेत. यावरुन असे आढळून येते की, यवतमाळ जिल्ह्यातील सर्वेक्षणासाठी निवडण्यात आलेल्या तालुक्यांत सिंचन स्त्रोत अत्यंत नगण्य प्रमाणात उपलब्ध आहेत.

## ३.३ लाभधारकांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थींचे लिंगभेदानुसार वर्गीकरण माहिती खालील प्रमाणे आढळून आली.

तक्ता क्र. ४

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावे | लाभार्थी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १. | रायगड | १) पेण | ४ | १२० | ११५ | २३५ |
| | | २) कर्जत | २ | ५७ | ४६ | १०३ |
| | | **एकूण जिल्हा** | **६** | **१७७** | **१६१** | **३३८** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७ | २२० | १४८ | ३६८ |
| | | **एकूण जिल्हा** | **७** | **२२०** | **१४८** | **३६८** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | १० | ११५ | ९७ | २१२ |
| | | २) सुरगाणा | १० | ९७ | ८६ | १८३ |
| | | **एकूण जिल्हा** | **२०** | **२१२** | **१८३** | **३९५** |
| ४. | नांदेड | १) किनवट | २ | ३७ | २२ | ५९ |
| | | **एकूण जिल्हा** | **२** | **३७** | **२२** | **५९** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ९ | १४३ | १३८ | २८१ |
| | | २) मारेगाव | ६ | ३८ | २८ | ६६ |
| | | ३) झरी-जामणी | ३ | १६ | ११ | २७ |
| | | **एकूण जिल्हा** | **१८** | **१९७** | **१७७** | **३७४** |
| | | **एकूण एकंदर** | **५३** | **८४३** | **६९१** | **१५३४** |

## ३.४ लाभार्थ्यांचा शैक्षणिक स्तर

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार केला असता खालील परिस्थिती आढळून आली.

**तक्ता क्र. ५**

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांतील व्यक्तिंची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १० वी पर्यंत | १२ वी पर्यंत | पदवी | निरक्षर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ११२ | ४ | ६ | ११३ |
| | | २) कर्जत | २० | ५७ | ५ | २ | ३९ |
| | | **एकूण जिल्हा** | **७८** | **१६९** | **९** | **८** | **१५२** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | २०७ | ३० | ७ | १२४ |
| | | **एकूण जिल्हा** | **७७** | **२०७** | **३०** | **७** | **१२४** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | १२४ | १३ | २ | ७३ |
| | | २) सुरगाणा | ३८ | ८९ | २२ | ५ | ६७ |
| | | **एकूण जिल्हा** | **८०** | **२१३** | **३५** | **७** | **१४०** |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ४१ | ३ | ० | १५ |
| | | **एकूण जिल्हा** | **१४** | **४१** | **३** | **०** | **१५** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | १४८ | ८ | २ | १२३ |
| | | २) मारेगाव | १३ | ४२ | ३ | २ | १९ |
| | | ३) झरी-जामणी | ६ | १७ | ० | ० | १० |
| | | **एकूण जिल्हा** | **९३** | **२०७** | **११** | **४** | **१५२** |
| | | **एकूण एकंदर** | **३४२** | **८३७** | **८८** | **२६** | **५८३** |

वरील तक्त्यावरुन असे आढळले की, पाहणी केलेल्या एकूण ३४२ कुटुंबांतील १५३४ व्यक्तींपैकी ९५१ म्हणजेच ६२% व्यक्ती साक्षर असून उर्वरीत ५८३ म्हणजेच ३८% व्यक्ती निरक्षर आहेत. म्हणजेच साक्षरतेचे प्रमाण चांगले आहे.

५.१ जिल्हावार परिस्थिती पाहिली असता, रायगड जिल्ह्यातील ७८ कुटुंबांतील ३३८ व्यक्तींपैकी १८६ म्हणजेच ५५% व्यक्ती साक्षर असून १५२ म्हणजेच ४५% व्यक्ती निरक्षर आहेत.

५.२ पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील ७७ कुटुंबांतील ३६८ व्यक्तींपैकी २४४ म्हणजेच ६६% व्यक्ती साक्षर असून १२४ म्हणजेच ३४% व्यक्ती निरक्षर आहेत.

५.३ नाशिक जिल्ह्यातील ८० कुटुंबांतील ३९५ व्यक्तींपैकी २५५ म्हणजेच ६५% व्यक्ती साक्षर असून १४० म्हणजेच ३५% व्यक्ती निरक्षर आहेत.

५.४ नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील १४ कुटुंबांतील ५९ व्यक्तींपैकी ४४ म्हणजेच ७५% व्यक्ती साक्षर असून १५ म्हणजेच २५% व्यक्ती निरक्षर आहेत.

५.५ यवतमाळ जिल्ह्यातील ९३ कुटुंबांतील ३७४ व्यक्तींपैकी २२२ म्हणजेच ५९% व्यक्ती साक्षर असून १५२ म्हणजेच ४१% व्यक्ती निरक्षर आहेत.

## ३.५ लाभार्थ्यांकडे असलेले पशुधन

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांकडे असलेले पशुधन खालील प्रमाणे आढळले.

### तक्ता क्र. ६

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | गाय | म्हैस | बैल | रेडा | शेळ्या | कोंबड्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | १६ | ८ | १९ | ० | २४ | १४७ |
| | | २) कर्जत | २० | ३२ | २ | २९ | ० | १८ | ६३ |
| | | **एकूण जिल्हा** | **७८** | **४८** | **१०** | **४८** | **०** | **४२** | **२१०** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | ४१ | ३५ | ११८ | २ | ८९ | २४२ |
| | | **एकूण जिल्हा** | **७७** | **४१** | **३५** | **११८** | **२** | **८९** | **२४२** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | १०४ | १० | ८२ | ० | ११४ | १७७ |
| | | २) सुरगाणा | ३८ | २३ | ७ | ४१ | ३२ | २३ | ३७ |
| | | **एकूण जिल्हा** | **८०** | **१२७** | **१७** | **१२३** | **३२** | **१३७** | **२१४** |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | १३ | ० | २२ | ० | ३ | १६ |
| | | **एकूण जिल्हा** | **१४** | **१३** | **०** | **२२** | **०** | **३** | **१६** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | ५८ | ८ | १२९ | ० | ६० | १४४ |
| | | २) मारेगाव | १३ | २३ | २ | २१ | ० | ६ | २४ |
| | | ३) झरी-जामणी | ६ | ११ | ० | १३ | ० | ० | ४ |
| | | **एकूण जिल्हा** | **९३** | **९२** | **१०** | **१६३** | **०** | **६६** | **१७२** |
| | | **एकूण एकंदर** | **३४२** | **३२१** | **७२** | **४७४** | **३४** | **३३७** | **८५४** |

६.१ रायगड, पुणे, नाशिक, नांदेड व यवतमाळ या जिल्ह्यांमधील ३४२ लाभार्थ्यांकडे ३२१ गायी, ७२ म्हशी, ४७४ बैल, ३४ रेडे, ३३७ शेळ्या व ८५४ कोंबड्या आहेत. या जिल्ह्यांपैकी नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे ३१% पशुधन आहे. तर नांदेड जिल्ह्यात ३% एवढे अत्यल्प पशुधन आहे.

६.२ पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांकडे एकूण ३२१ गायींपैकी १५% गायी रायगड जिल्ह्यात , १३% गायी पुणे जिल्ह्यात, ३९% गायी नाशिक जिल्ह्यात, ४% गायी नांदेड जिल्ह्यात, २९% गायी यवतमाळ जिल्ह्यात आहेत. सर्व जिल्ह्यांमध्ये एकूण ७२ म्हशी असून यापैकी १४% रायगड जिल्ह्यात, ४९% पुणे जिल्ह्यात, २३% नाशिक जिल्ह्यात व १४% यवतमाळ जिल्ह्यात आहेत. नांदेड जिल्ह्यातील लाभार्थ्यांकडे म्हशी आढळून आल्या नाहीत. एकूण ३४२ लाभार्थ्यांकडे ४७४ बैल

आहेत. या एकूण बैलांपैकी १०% रायगड जिल्ह्यात, २५% पुणे जिल्ह्यात, २६% नाशिक जिल्ह्यात, ५% नांदेड जिल्ह्यात व ३४% यवतमाळ जिल्ह्यात आहेत. रेड्याच्या बाबतीत ३४ पैकी ९४% रेडे नाशिक जिल्ह्यात असून ६% रेडे पुणे जिल्ह्यात आहेत. उर्वरीत जिल्ह्यांमध्ये रेडे आढळून आलेले नाहीत. एकूण ३३७ शेळ्यांपैकी १२% रायगड जिल्ह्यात, २६% पुणे जिल्ह्यात, ४१% नाशिक जिल्ह्यात, १% नांदेड जिल्ह्यात व २०% यवतमाळ जिल्ह्यात शेळ्या आहेत. सर्व लाभार्थ्यांकडे मिळून ८५४ कोंबड्या असल्याचे दिसून आले. यापैकी २५% कोंबड्या रायगड जिल्ह्यात, २८% पुणे जिल्ह्यात, २५% नाशिक जिल्ह्यात, २% नांदेड जिल्ह्यात व २०% कोंबड्या यवतमाळ जिल्ह्यात आहेत.

६.३ रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात ५८ लाभार्थ्यांकडे मिळून १६ गायी, ८ म्हशी, १९ बैल, २४ शेळ्या व १४७ कोंबड्या एवढे पशुधन आहे. कर्जत तालुक्यात २० लाभार्थ्यांकडे ३२ गायी, २ म्हशी, २९ बैल, १८ शेळ्या व ६३ कोंबड्या आहेत.

६.४ पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील ७७ लाभार्थ्यांकडे मिळून ४१ गायी, ३५ म्हशी, ११८ बैल, २ रेडे, ८९ शेळ्या व २४२ कोंबड्या एवढे पशुधन आहे.

६.५ नाशिक जिल्ह्यातील लाभार्थ्यांकडे असलेल्या एकूण ६५० पशुधनापैकी ७५% पशुधन त्र्यंबकेश्वर तालुक्यातील लाभार्थ्यांकडे तर २५% पशुधन सुरगाणा तालुक्यातील लाभार्थ्यांकडे आहे. एकूण १२७ गाईंपैकी ८२% गायी त्र्यंबकेश्वर तालुक्यात तर १८% गायी सुरगाणा तालुक्यात आहेत. एकूण १७ म्हशींपैकी ५९% म्हशी त्र्यंबकेश्वर तालुक्यात तर ४१% म्हशी सुरगाणा तालुक्यात आहेत. एकूण १२३ बैलांपैकी ६७% बैल त्र्यंबकेश्वर तालुक्यात तर ३३ % बैल सुरगाणा तालुक्यात आहेत. रेड्यांच्या बाबतीत १००% रेडे सुरगाणा तालुक्यात आहेत. या एकाच बाबतीत सुरगाणा तालुक्यातील पशुधन त्र्यंबकेश्वर तालुक्यापेक्षा जास्त आहे. एकूण शेळ्या व कोंबड्यांपैकी ८३% शेळ्या व कोंबड्या त्र्यंबकेश्वर तालुक्यात तर १७% शेळ्या व कोंबड्या सुरगाणा तालुक्यात आहेत.

६.६ नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील एकूण लाभार्थ्यांकडे मिळून १३ गायी, २२ बैल, ३ शेळ्या व १६ कोंबड्या एवढे पशुधन आहे.

६.७ यवतमाळ जिल्ह्यातील लाभार्थ्यांकडे असलेल्या एकूण ५०३ पशुधनापैकी ७९% पशुधन केळापूर तालुक्यात तर १५% मारेगाव व ६% झरी जामणी तालुक्यातील लाभार्थ्यांकडे आहे. परंतु, दर लाभार्थ्यांकडे असलेल्या पशुधनाची संख्या मारेगाव तालुक्यात अधिक आहे.

६.८ केळापूर तालुक्यात ५८ गायी, ८ म्हशी, १२९ बैल, ६० शेळ्या व १४४ कोंबड्या आहेत. मारेगाव तालुक्यात २३ गायी, २ म्हशी, २१ बैल, ६ शेळ्या व २४ कोंबड्या आहेत. झरी जामणी तालुक्यात ११ गायी, १३ बैल, व ४ कोंबड्या आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांकडे मिळून एकही रेडा नाही.

## ३.६ लाभार्थ्यांच्या घराची स्थिती

योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या घरांची स्थिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ७**

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | कच्चे साधी झोपडी | कच्चे मंगलोरी कौलाची झोपडी | पक्के पत्र्याचे बांधकाम | पक्के शासनाचे घरकूल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | २ | १२ | ११ | ३३ |
| | | २) कर्जत | २० | ० | ७ | ९ | ४ |
| | | **एकूण जिल्हा** | **७८** | **२** | **१९** | **२०** | **३७** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | १ | ५८ | १७ | १ |
| | | **एकूण जिल्हा** | **७७** | **१** | **५८** | **१७** | **१** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | १ | १० | २७ | ४ |
| | | २) सुरगाणा | ३८ | १ | २६ | ११ | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **८०** | **२** | **३६** | **३८** | **४** |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ३ | ६ | ४ | १ |
| | | **एकूण जिल्हा** | **१४** | **३** | **६** | **४** | **१** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | १२ | ३० | १९ | १३ |
| | | २) मारेगाव | १३ | २ | ८ | ३ | ० |
| | | ३) झरी-जामणी | ६ | १ | १ | ४ | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **९३** | **१५** | **३९** | **२६** | **१३** |
| | | **एकूण एकंदर** | **३४२** | **२३** | **१५८** | **१०५** | **५६** |

७.१ रायगड, पुणे, नाशिक, नांदेड व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये पाहणी केलेल्या लाभार्थ्यांच्या घराची स्थिती पाहिली असता निम्मी घरे कच्च्या स्वरुपाची असल्याचे आढळून आले. एकूण ३४२ घरांपैकी पक्क्या स्वरुपाची स्वत:ची पत्र्याचे बांधकाम केलेली घरे असलेल्यांचे प्रमाण ३१% आहे व १६% पक्की घरे शासनाने बांधून दिलेली आहेत.

७.२ कच्च्या घरांमध्ये १८१ पैकी १३% घरे साधी झोपडी असून ८७% घरे मंगलोरी कौलाची झोपडी आहेत. पक्क्या घरांमध्ये १६१ पैकी ६५% घरे स्वतःची आहेत तर ३५% शासनाने बांधून दिलेली आहेत.

७.३ एकूण १८१ कच्च्या घरांपैकी १२% रायगड जिल्ह्यात, ३२% पुणे जिल्ह्यात, २१% नाशिक जिल्ह्यात, ५% नांदेड जिल्ह्यात व ३०% यवतमाळ जिल्ह्यात आहेत.

७.४ एकूण १६१ पक्क्या घरांपैकी ३५% रायगड जिल्ह्यात, १२% पुणे जिल्ह्यात, २६% नाशिक जिल्ह्यात, ३% नांदेड जिल्ह्यात व २४% यवतमाळ जिल्ह्यात आहेत.

७.५ रायगड जिल्ह्यातील एकूण ७८ लाभार्थ्यांपैकी ७३% लाभार्थ्यांची घरे पक्की असून २७% लाभार्थ्यांची घरे कच्ची आहेत. रायगड जिल्ह्यात ४७% लाभार्थ्यांना शासनाने पक्की घरे दिलेली आहेत. घरांच्या स्थितीचे तालुकावार विश्लेषण केले असता रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील ५८ घरांपैकी २४% लाभार्थ्यांची घरे कच्ची आहेत तर कर्जत तालुक्यातील २० घरांपैकी ३५% लाभार्थ्यांची घरे कच्च्या स्वरुपाची आहेत. एकूण रायगड मधील ५७ घरांपैकी पक्क्या घरांपैकी ७७% घरे पेण तालुक्यात आहेत, तर २३% घरे कर्जत तालुक्यात आहेत. एकूण २१ कच्च्या घरांपैकी ६७% घरे पेण तालुक्यात व ३३% घरे कर्जत तालुक्यात आहेत.

७.६ पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांकडे असलेल्या एकूण ७७ घरांपैकी ७७% घरे कच्च्या स्वरुपाची असून २३% घरे पक्की आहेत. एकूण कच्च्या ५९ घरांपैकी ९८% घरे मंगलोरी कौलाची झोपडी आहेत तर २% घरे साधी झोपडी आहे. एकूण १८ पक्क्या घरांपैकी १७ लाभार्थ्यांचे स्वतःचे घर आहे तर फक्त एक लाभार्थ्याला शासनाने घरकुल बांधून दिलेले आहे.

७.७ नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण ८० लाभार्थ्यांपैकी जवळपास निम्मी घरे कच्च्या स्वरुपाची आहेत. एकूण कच्च्या ३८ घरांपैकी ९५% मंगलोरी कौलाची झोपडी व ५% साधी झोपडी आहेत. एकूण ४२ पक्क्या घरांपैकी ९०% घरे लाभार्थ्यांची स्वतःची आहेत. तर १०% लाभार्थ्यांना शासनाने घर बांधून दिलेले आहे. तालुकावार विश्लेषणात असे आढळून येते की, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ४२ घरांपैकी २६% लाभार्थींकडे कच्च्या स्वरुपाची घरे आहेत, तर हेच प्रमाण सुरगाणा तालुक्यात ३८ घरांपैकी ७१% आहे. एकूण ४२ पक्क्या घरांपैकी ७४% पक्की घरे त्र्यंबकेश्वर तालुक्यात तर २६% घरे सुरगाणा तालुक्यात आहेत. पाहणी केलेल्या सुरगाणा तालुक्यातील लाभार्थ्यांना अद्याप शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ मिळाल्याचे दिसून आले नाही.

७.८ नांदेड जिल्ह्यातील एकूण लाभार्थ्यांकडे असलेल्या कच्च्या घराचे प्रमाण ६४% आहे तर ३६% लाभार्थी पक्क्या घरात राहतात. एकूण कच्च्या घरांपैकी ३३% लाभार्थ्यांकडे साधी झोपडी आहे तर ६७% लाभार्थ्यांकडे मंगलोरी कौलाची झोपडी आहे. एकूण पक्क्या घरांपैकी ८०% लाभार्थ्यांकडे स्वतःचे पक्के घर आहे. तर एका लाभार्थ्याला शासनाने घरकुल बांधून दिलेले आहे.

७.९ यवतमाळ जिल्ह्यातील एकुण ९३ लाभार्थ्यांकडे असलेल्या घरांपैकी ५८% लाभार्थी कच्च्या घरात राहतात. तर ४२% लाभार्थ्यांकडे पक्की घरे आहेत. एकुण कच्च्या घरांचा विचार करता २८% साधी झोपडी तर ७२% मंगलोरी कौलाची झोपडी आहेत. एकूण पक्क्या घरांपैकी ६७% घरे स्वतः लाभार्थ्यांची तर ३३% घरे शासनाने बांधून दिली आहेत. तालुकावार विश्लेषणात असे आढळून येते की, केळापूर तालुक्यातील ५७% लाभार्थ्यांकडे कच्च्या स्वरुपाची घरे आहेत, तर हेच प्रमाण मारेगाव तालुक्यात ७७% व झरी जामणी तालुक्यात ३३% आहे. एकूण पक्क्या घरांपैकी केळापूर तालुक्यातील ८२% लाभार्थ्यांकडे पक्की घरे आहेत. हेच प्रमाण मारेगाव तालुक्यात ८% व झरी जामणी तालुक्यात १०% आहे. शासनाने दिलेल्या घरांचे प्रमाण केळापूर तालुक्यात १००% असून मारेगाव व झरी जामणी तालुक्यातील लाभार्थ्यांना शासनाने एकही घरकुल दिलेले नाही.



## ३.७ लाभार्थ्यांचे जमातनिहाय वर्गीकरण

पाहणी केलेल्या लाभार्थ्यांचे जमातनिहाय वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ८

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | महादेव कोळी | कोकणा | ठाकूर | कोलाम | आंध | कातकरी | गोंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ० | ० | ६ | ० | ० | ५२ | ० |
| | | २) कर्जत | २० | ३ | ० | १७ | ० | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ७८ | ३ | ० | २३ | ० | ० | ५२ | ० |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | ७७ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ७७ | ७७ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | १९ | १० | १३ | ० | ० | ० | ० |
| | | २) सुरगाणा | ३८ | ३ | ३५ | ० | ० | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ८० | २२ | ४५ | १३ | ० | ० | ० | ० |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ० | ० | ० | २ | ६ | ० | ६ |
| | | एकूण जिल्हा | १४ | ० | ० | ० | २ | ६ | ० | ६ |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | ० | ० | ० | ७४ | ० | ० | ० |
| | | २) मारेगाव | १३ | ० | ० | ० | १३ | ० | ० | ० |
| | | ३) झरी-जामणी | ६ | ० | ० | ० | ६ | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ९३ | ० | ० | ० | ९३ | ० | ० | ० |
| | | एकूण एकंदर | ३४२ | १०२ | ४५ | ३६ | ९५ | ६ | ५२ | ६ |

८.१ वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांपैकी १५% लाभार्थी कातकरी समाजाचे असून ३०% लाभार्थी महादेव कोळी समाजाचे आहेत. कोकणा, ठाकूर व कोलाम समाजाच्या लाभार्थ्यांचे प्रमाण अनुक्रमे १३%, १०% व २८% इतके आहे. आंध व गोंड समाजाचे लाभार्थी सर्वात कमी असून त्यांचे प्रमाण प्रत्येकी २% इतके आहे.

८.२ रायगड जिल्ह्यात ६७% कातकरी, २९% ठाकूर, व ४% महादेव कोळी समाजाचे लाभार्थी आहेत. पेण तालुक्यात ९०% लाभार्थी कातकरी समाजाचे व १०% लाभार्थी ठाकूर समाजाचे आहेत. कर्जत तालुक्यात ८५% लाभार्थी ठाकूर समाजाचे असून १५% लाभार्थी महादेव कोळी समाजाचे आहेत.

८.३ पुणे जिल्ह्यातील सर्व ७७ लाभार्थी महादेव कोळी या जमातीचे आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण लाभार्थींपैकी २८% महादेव कोळी, ५६% कोकणा व १६% ठाकूर समाजाचे लाभार्थी आढळून आले. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील एकूण लाभार्थींपैकी ४५% महादेव कोळी, २४% कोकणा व ३१% ठाकूर समाजाचे लाभार्थी असल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे सुरगाणा तालुक्यात ९२% कोकणा व ८% महादेव कोळी समाजाचे लाभार्थी असल्याचे आढळून आले.

८.४ नांदेड जिल्ह्यातील एकूण लाभार्थींपैकी १४% कोलाम, ४३% आंध व ४३% गोंड जमातीचे लाभार्थी असल्याचे आढळून आले.

८.५ यवतमाळ जिल्ह्यामध्ये १००% लाभार्थी कोलाम जमातीचे आहेत.

८.६ संपूर्ण पाहणीमध्ये असे आढळून आले की, एकूण महादेव कोळी या समाजाच्या लाभार्थींपैकी ३% रायगड, ७५% पुणे व २२% नाशिक जिल्ह्यातील या समाजाचे लाभार्थी आहेत.

८.७ कोकणा समाजाचे सर्व लाभार्थी नाशिक जिल्ह्यातील आहेत. ठाकूर समाजाचे ६४% लाभार्थी रायगड जिल्ह्यात तर ३६% लाभार्थी नाशिक जिल्ह्यातील आहेत.

८.८ कोलाम समाजाचे ९८% लाभार्थी यवतमाळ जिल्ह्यातील व २% लाभार्थी नांदेड जिल्ह्यातील आहेत.

८.९ आंध व गोंड समाजाचे सर्व लाभार्थी नांदेड जिल्ह्यातील आहेत. कातकरी समाजाचे सर्व लाभार्थी रायगड जिल्ह्यातील आहेत.

## जनउत्कर्ष - वाडी व सुधारीत शेती योजनेचे विश्लेषण

### ४.१ लाभार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या सहली, बैठका चर्चासत्रे व प्रशिक्षण शिबिरे

जनउत्कर्ष कार्यक्रम राबविताना सहभागी धारकांना विविध घटकांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रकल्प सुरु होण्यापूर्वी शेतकऱ्यांना जव्हार, वासंदा, पेठ, पालघर, विक्रमगड, हिवरेबाजार, लाचखर्डी, हर्सूल, नाशिक, राळेगणसिद्धी येथील वाडी कार्यक्रम दाखविण्यात आला. अभ्यास दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना कार्यक्रमाची चांगली माहिती झाली व त्यांनी आपल्या गावातील इतर शेतकऱ्यांना जनउत्कर्ष कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केल्याचे आढळले.

वाडी कार्यक्रमात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये गटचर्चा, अनुभव कथन, प्रात्यक्षिक यावर भर देण्यात आल्याचे निदर्शनास आले.

लाभार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या सहली, बैठका, चर्चासत्रे व प्रशिक्षण शिबिरे यांची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे.

**तक्ता क्र. ९**

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | सहली | बैठका | चर्चासत्र | प्रशिक्षण शिबिर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ९३ | १६७५ | २०८० | १७१६ |
| | | २) कर्जत | २० | ४६ | ८०० | ७५५ | ४२६ |
| | | **एकूण जिल्हा** | **७८** | **१३९** | **२४७५** | **२८३५** | **२१४२** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | १६० | ६१७ | ४४१ | ३३२ |
| | | **एकूण जिल्हा** | **७७** | **१६०** | **६१७** | **४४१** | **३३२** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | ८३ | ९५५ | ३५६ | ५८६ |
| | | २) सुरगाणा | ३८ | १०९ | ८४३ | ८४६ | ८५० |
| | | **एकूण जिल्हा** | **८०** | **१९२** | **१७९८** | **१२०२** | **१४३६** |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ७४ | ५६ | ४० | २४ |
| | | **एकूण जिल्हा** | **१४** | **७४** | **५६** | **४०** | **२४** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | ६३ | ५४८ | २२९ | २२९ |
| | | २) मारेगाव | १३ | ६ | १६६ | १५८ | १०० |
| | | ३) झरी-जामणी | ६ | ८ | ९१ | ९७ | ६१ |
| | | **एकूण जिल्हा** | **९३** | **७७** | **८०५** | **४८४** | **३९०** |
| | | **एकूण एकंदर** | **३४२** | **६४२** | **५७५१** | **५००२** | **४३२४** |

९.१ पाहणी केलेल्या एकूण ३४२ लाभार्थ्यांसाठी ६४२ सहली, ५७५१ बैठका, ५००२ चर्चासत्रे व ४३२४

९.१ पाहणी केलेल्या एकूण ३४२ लाभार्थ्यांसाठी ६४२ सहली, ५७५१ बैठका, ५००२ चर्चासत्रे व ४३२४ प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आले.

९.२ रायगड जिल्ह्यातील एकूण सहलींपैकी ६७% सहली पेण तालुक्यात व ३३% सहली कर्जत तालुक्यात काढण्यात आल्या. एकूण बैठकांपैकी ६८% बैठका पेण व ३२% बैठका कर्जत तालुक्यात घेण्यात आल्या. एकूण चर्चासत्रांपैकी ७३% चर्चासत्रे पेण व २७% चर्चासत्रे कर्जत तालुक्यात घेण्यात आली, एकूण प्रशिक्षणांपैकी ८०% प्रशिक्षणे पेण व २०% प्रशिक्षणे कर्जत तालुक्यात घेण्यात आली.

९.३ पुणे जिल्ह्यात एकूण १६० सहली, ६१७ बैठका, ४४१ चर्चासत्रे व ३३२ प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आले.

९.४ नाशिक जिल्ह्यात एकूण सहलींपैकी ४३% सहली त्र्यंबकेश्वर व ५७% सहली सुरगाणा तालुक्यात घेण्यात आल्या. एकूण बैठकांपैकी ५३% बैठका त्र्यंबकेश्वर व ४७% बैठका सुरगाणा तालुक्यात घेण्यात आल्या. एकूण चर्चासत्रांपैकी ३०% चर्चासत्रे त्र्यंबकेश्वर व ७०% चर्चासत्रे सुरगाणा तालुक्यात घेण्यात आली. एकूण प्रशिक्षणांपैकी ४१% प्रशिक्षणे त्र्यंबकेश्वर व ५९% प्रशिक्षणे सुरगाणा तालुक्यात घेण्यात आली.

९.५ नांदेड जिल्ह्यात ७४ सहली, ५६ बैठका, ४० चर्चासत्रे व २४ प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आले.

९.६ यवतमाळ जिल्ह्यात ३ तालुक्यांमध्ये घेण्यात आलेल्या एकूण सहली, बैठका, चर्चासत्रे व प्रशिक्षण शिबिरे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तालुका | सहली | बैठका | चर्चासत्रे | प्रशिक्षण शिबिरे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | केळापूर | ८२% | ६८% | ४७% | ५९% |
| २. | मारेगाव | ८% | २१% | ३३% | २६% |
| ३. | झरी - जामणी | १०% | ११% | २०% | १५% |

एकूण सहली, बैठका, चर्चासत्रे व प्रशिक्षण शिबिरांपैकी सर्वात जास्त सहली नाशिक जिल्ह्यात घेण्यात आल्या, तर सर्वात जास्त बैठका, चर्चासत्रे व प्रशिक्षण शिबिरे रायगड जिल्ह्यात घेण्यात आले.

रायगड, पुणे, नाशिक, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील ३४२ लाभार्थ्यांनी लाभापूर्वी व लाभानंतर घेतलेली पिके खालील प्रमाणे आढळून आली.

## तक्ता क्र. १०

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | लाभापूर्वी घेतलेली पिके | | | | लाभानंतर घेतलेली पिके | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भात/ वरई | नाचणी/ नागली | तूर | उडीद | भात/ वरई | ज्वारी | गहू | बाजरी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ४३ | २८ | ० | ० | ३४ | ० | ० | ० |
| | | २) कर्जत | २० | ३३ | १५ | ० | ५ | ३२ | ० | ० | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **७८** | **७६** | **४३** | **०** | **५** | **६६** | **०** | **०** | **०** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | ११९ | ६४ | १९ | ११ | ८९ | ८ | १२ | १३ |
| | | **एकूण जिल्हा** | **७७** | **११९** | **६४** | **१९** | **११** | **८९** | **८** | **१२** | **१३** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | ७४ | ४१ | ० | २१ | ६४ | ० | ८ | ० |
| | | २) सुरगाणा | ३८ | ३२ | १७ | १६ | २९ | ४७ | ० | ० | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **८०** | **१०६** | **५८** | **१६** | **५०** | **१११** | **०** | **८** | **०** |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ० | ० | १४ | १ | ० | १ | ० | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **१४** | **०** | **०** | **१४** | **१** | **०** | **१** | **०** | **०** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | ० | ० | ६९ | ० | ० | ७१ | १ | ० |
| | | २) मारेगाव | १३ | ० | ० | १३ | ० | ० | ११ | ० | ० |
| | | ३) झरी-जामणी | ६ | ० | ० | ६ | ० | ० | ० | ० | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **९३** | **०** | **०** | **८८** | **०** | **०** | **८२** | **१** | **०** |
| | | **एकूण एकंदर** | **३४२** | **३०१** | **१६५** | **१३७** | **६७** | **२६६** | **९१** | **२१** | **१३** |

१०.१ वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, सुधारित शेती कार्यक्रम अंतर्गत लाभार्थ्यांना वाटप केलेली खते, बियाणे व लागवड पद्धतीच्या विविध प्रशिक्षणांमुळे आदिवासी भागातील बहुतेक लाभार्थी जी पिके पूर्वी घेत होते, त्यात वाढ झाली अथवा इतर पिके घेण्यात आलेली असल्याचे आढळून आले.

१०.२ रायगड, पुणे, नाशिक, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील पाहणी करीता निवडलेली ३४२ कुटुंबे लाभापूर्वी भात / वरई, नाचणी / नागली, तूर, उडीद ही पिके घेत होती. तर लाभानंतर भात / वरई, ज्वारी, गहू व बाजरी अशी इतर जादा पिके घेत असल्याचे आढळून आले.



वाडीची पाहणी करताना अधिकारी / कर्मचारीवृंद

आणि वाडी कार्यक्रमाचे लाभार्थी



## ४.३ लाभार्थ्यांना मिळालेली फळरोपे

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांना लाभापूर्वी मिळालेली फळरोपे व प्रत्यक्ष जगलेली फळरोपे खालील तक्त्यात दिली आहे.

### तक्ता क्र. ११

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | लाभापूर्वी वाटप केलेली फळरोपे | | | | | | लाभानंतर जगलेली फळरोपे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आंबा | काजू | सिताफळ | आवळा | लिंबू | पेरु | आंबा | काजू | सिताफळ | आवळा | लिंबू | पेरु |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ११६० | २३२० | १८८ | २१० | १३६ | १६५ | ७८४ | १३९९ | ९५ | ८९ | ६७ | ७९ |
| | | २) कर्जत | २० | ४०० | ८०० | ६० | २८ | ६१ | ६८ | २३८ | ४६९ | २७ | २० | ३४ | ४० |
| | | एकूण जिल्हा | ७८ | १५६० | ३१२० | २४८ | २३८ | १९७ | २३३ | १०२२ | १८६८ | १२२ | १०९ | १०१ | ११९ |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | १६१५ | ९८९ | ३७ | ७२१ | ९३ | ६१ | १११६ | ५६० | १९ | ३२७ | ५७ | ३१ |
| | | एकूण जिल्हा | ७७ | १६१५ | ९८९ | ३७ | ७२१ | ९३ | ६१ | १११६ | ५६० | १९ | ३२७ | ५७ | ३१ |
| ३. | नाशिक | १)त्र्यंबकेश्वर | ४२ | ७८५ | ४६५ | ० | १४० | ११२ | १०६८ | ५८१ | ३१६ | ० | ८९ | ६७ | ८२८ |
| | | २) सुरगाणा | ३८ | ७४० | ११०५ | १२२ | ३१५ | ११५ | १०९ | ६६५ | ९६४ | १०१ | २२८ | ७७ | ७९ |
| | | एकूण जिल्हा | ८० | १५२५ | १५७० | १२२ | ४५५ | २२७ | ११७७ | १२४६ | १२८० | १०१ | ३१७ | १४४ | ९०७ |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ४२० | ० | २० | २६० | २ | ५ | १०४ | ० | ५ | ११२ | १ | ० |
| | | एकूण जिल्हा | १४ | ४२० | ० | २० | २६० | २ | ५ | १०४ | ० | ५ | ११२ | १ | ० |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | २०८० | ० | ८० | १५४५ | ४१ | १५ | २३३ | ० | ९ | ३२६ | ५ | ३ |
| | | २) मारेगाव | १३ | ३७० | ० | ० | २६० | ५ | ० | १६९ | ० | ० | १५६ | ५ | ० |
| | | ३) झरी-जामणी | ६ | १८० | ७० | ० | ७० | ० | ० | ८२ | ४१ | ० | ४५ | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ९३ | २६३० | ७० | ८० | १८७५ | ४६ | १५ | ४८४ | ४१ | ९ | ५२७ | १० | ३ |
| | एकूण एकंदर | | ३४२ | ७७५० | ५७४९ | ५०७ | ३५४९ | ५६५ | १४९१ | ३९७२ | ३७४९ | २५६ | १३९२ | ३१३ | १०६० |

११.१ वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांना ७७५० आंबा रोपांचे वाटप केले. पण प्रत्यक्षात ३९७२ आंबा झाडे म्हणजेच ५१% झाडे जगली आहेत. तर ५७४९ काजू रोपांचे वाटप केले, त्यापैकी ३७४९ काजू झाडे म्हणजेच ६५% झाडे जगली आहेत. ५०७ सिताफळ रोपे वाटप केली गेली, त्यापैकी २५६ म्हणजेच ५०% झाडे जगली आहेत. तर ३५४९ आवळा रोपांचे वाटप केले गेले, त्यापैकी प्रत्यक्षात १३९२ म्हणजेच ३९% झाडे जगली आहेत. वाटप केलेल्या ५६५ लिंबू रोपांपैकी प्रत्यक्षात ३१३ म्हणजेच ५५% झाडे जगली आहेत. तर लाभार्थ्यांना वाटप केलेल्या १४९१ पेरु रोपांपैकी प्रत्यक्षात १०६० म्हणजेच ७१% झाडे जगली असल्याचे दिसून आले.

११.२ रायगड जिल्ह्यातील ७८ कुटुंबांना वाटप केलेली अनुक्रमे आंबा रोपे - १५६० पैकी १०२२ म्हणजेच ६६% झाडे जगलीत, काजू रोपे - ३१२० पैकी १८६८ म्हणजेच ६०% झाडे जगलीत, सिताफळ रोपे - २४८ पैकी १२२ म्हणजेच ४९% झाडे जगलीत, आवळा रोपे - २३८ पैकी १०९ म्हणजेच ४६% झाडे जगलीत, लिंबू रोपे - १९७ पैकी १०१ म्हणजेच ५१% झाडे जगलीत तर वाटप केलेली पेरु रोपे - २३३ पैकी ११९ म्हणजेच ५१% झाडे जगली आहेत.

११.३ पुणे जिल्ह्यातील ७७ कुटुंबांना वाटप केलेली अनुक्रमे आंबा रोपे - १६१५ पैकी १११६ म्हणजेच ६९% झाडे जगलीत, काजू रोपे - ९८९ पैकी ५६० म्हणजेच ५७% झाडे जगलीत, सिताफळ रोपे - ३७ पैकी १९ म्हणजेच ५१% झाडे जगलीत, आवळा रोपे - ७२१ पैकी ३२७ म्हणजेच ४५% झाडे जगलीत, लिंबू रोपे - ९३ पैकी ५७ म्हणजेच ६१% झाडे जगलीत तर वाटप केलेली पेरु रोपे - ६१ पैकी ३१ म्हणजेच प्रत्यक्षात ५१% झाडे जगली आहेत.

११.४ नाशिक जिल्ह्यातील ८० कुटुंबांना वाटप केलेली अनुक्रमे आंबा रोपे - १५२५ पैकी १२४६ म्हणजेच ८२% झाडे जगलीत, काजू रोपे - १५७० पैकी १२८० म्हणजेच ८२% झाडे जगलीत, सिताफळ रोपे - १२२ पैकी १०१ म्हणजेच ८३% झाडे जगलीत, आवळा रोपे - ४५५ पैकी ३१७ म्हणजेच ७०% झाडे जगलीत, लिंबू रोपे - २२७ पैकी १४४ म्हणजेच ६३% झाडे जगलीत तर वाटप केलेली पेरु रोपे - ११७७ पैकी ९०७ म्हणजेच प्रत्यक्षात ७७% झाडे जगली आहेत.

११.५ नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात १४ कुटुंबांना वाटप केलेली अनुक्रमे आंबा रोपे - ४२० पैकी १०४ म्हणजेच २५% झाडे जगलीत. सिताफळ रोपे - २० पैकी ५ म्हणजेच २५% झाडे जगलीत, आवळा रोपे - २६० पैकी ११२ म्हणजेच ४३% झाडे जगलीत, लिंबू रोपे - २ पैकी १ म्हणजेच ५०% झाडे जगलीत तर वाटप केलेली पेरु रोपे - ५ पैकी एकही झाड जगू शकले नाही.

११.६ यवतमाळ जिल्ह्यातील ९३ कुटुंबांना वाटप केलेली अनुक्रमे आंबा रोपे - २६३० पैकी ४८४ म्हणजेच १८% झाडे जगलीत, काजू रोपे - ७० पैकी ४१ म्हणजेच ५९% झाडे जगलीत, सिताफळ रोपे - ८० पैकी ९ म्हणजेच ११% झाडे जगलीत, आवळा रोपे - १८७५ पैकी ५२७ म्हणजेच २८% झाडे जगलीत, लिंबू रोपे - ४६ पैकी १० म्हणजेच २२% झाडे जगलीत तर वाटप केलेली पेरु रोपे - १५ पैकी ३ म्हणजेच प्रत्यक्षात २०% झाडे जगली आहेत.

वरील पाहणी केलेल्या रायगड, पुणे, नाशिक, नांदेड व यवतमाळ या ५ जिल्ह्यांतील वाटप केलेली फळरोपे व प्रत्यक्षात जगलेली फळरोपे यांचा तुलनात्मक विचार करता फळरोपांची जगण्याची संख्या, फळांचे उत्पादन इ. नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक असल्याचे दिसून आले.



पेरूचे उत्पादन दाखविताना लाभार्थी



आंब्याचे उत्पादन दाखविताना लाभार्थी



आंब्याचे उत्पादन दाखविताना लाभार्थी महिला



काजू लागवड



## ४.४ लाभार्थ्यांना मिळालेली वनरोपे

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांना लाभापूर्वी मिळालेली वनरोपे व प्रत्यक्ष जगलेली वनरोपे यांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

### तक्ता क्र. १२

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | लाभापूर्वी वाटप केलेली रोपे | | | | | लाभानंतर जगलेली रोपे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कढीपत्ता | पपई | ग्लिरी-सिडीया | साग | बांबू | कढीपत्ता | पपई | ग्लिरी-सिडीया | साग | बांबू |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ० | ६९ | ३०० | २८५५ | १८८६ | ० | २८ | १७० | १३२३ | ९२८ |
| | | २) कर्जत | २० | ० | ० | ० | १६५० | १०६० | ० | ० | ० | ७१२ | ४४१ |
| | | एकूण जिल्हा | ७८ | ० | ६९ | ३०० | ४५०५ | २९४६ | ० | २८ | १७० | २०३५ | १३६९ |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | ९२ | २१२ | १०० | ४५८ | २०५ | ६८ | ३५ | ५० | २७९ | ३६ |
| | | एकूण जिल्हा | ७७ | ९२ | २१२ | १०० | ४५८ | २०५ | ६८ | ३५ | ५० | २७९ | ३६ |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | ८३ | ७८ | ३९७० | ३९०० | २९५५ | ८१ | ८१ | १७८६ | १८०५ | ११३७ |
| | | २) सुरगाणा | ३८ | ११९ | २२४ | ३१२० | ६२३० | २८६० | ८१ | १५२ | १९४७ | ४१४५ | १८७० |
| | | एकूण जिल्हा | ८० | २०२ | ३०२ | ७०९० | १०१३० | ५८१५ | १६२ | २३३ | ३७३३ | ५९५० | ३००७ |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ६ | ० | २७५ | ६१० | ६०० | ० | ० | ३७ | १७ | ३१ |
| | | एकूण जिल्हा | १४ | ६ | ० | २७५ | ६१० | ६०० | ० | ० | ३७ | १७ | ३१ |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | १ | ६ | ११२० | ३३६० | ३१८५ | ० | २ | १६४ | ९०९ | ४९५ |
| | | २) मारेगाव | १३ | ० | ० | ३५५ | ६५० | ६२५ | ० | ० | १०१ | २४८ | १७३ |
| | | ३) झरी-जामणी | ६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | एकूण जिल्हा | ९३ | १ | ६ | १४७५ | ४०१० | ३८१० | ० | २ | २६५ | ११५७ | ६६८ |
| | | एकूण एकंदर | ३४२ | ३०१ | ५८९ | ९२४० | १९७१३ | १३३७६ | २३० | २९८ | ४२५५ | ९५१८ | ५१११ |

१२.१ वरील तक्त्यावरुन असे आढळून येते की, पाहणी केलेल्या ३४२ कुटुंबांना वाटप केलेल्या ३०१ कढीपत्ता रोपांपैकी २३० म्हणजेच ७६% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. पपई रोपे ५८९ वाटप केली होती त्यापैकी २९८ म्हणजेच ५१% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. ग्लिरीसिडिया ची ९२४० रोपे वाटप केली त्यापैकी ४२५५ म्हणजेच ४६% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. सागाच्या १९७१३ वाटप केलेल्या रोपांपैकी ९५१८ म्हणजेच ४८% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. तर वाटप केलेल्या १३३७६ बांबू रोपांपैकी ५१११ म्हणजेच ३८% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत.

१२.२ रायगड जिल्ह्यातील निवडलेल्या ७८ कुटुंबांना कढीपत्ता रोपांचे वाटप केले नव्हते. पपई रोपे ६९ वाटप केली होती त्यापैकी २८ म्हणजेच ४१% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. ग्लिरीसिडियाची ३०० रोपे वाटप केली त्यापैकी १७० म्हणजेच ५७% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. सागाच्या ४५०५ वाटप केलेल्या रोपांपैकी २०३५ म्हणजेच ४५% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. तर वाटप केलेल्या २९४६ बांबू रोपांपैकी १३६९ म्हणजेच ४६% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत.

१२.३ पुणे जिल्ह्यातील निवडलेल्या ७७ कुटुंबांना ९२ कढीपत्ता रोपांचे वाटप केले होते. त्यापैकी ६८ म्हणजेच ७४% झाडे जगली. पपई रोपे २१२ वाटप केली होती त्यापैकी ३५ म्हणजेच १७% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. ग्लिरीसिडिया ची १०० रोपे वाटप केली त्यापैकी ५० म्हणजेच ५०% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. सागाच्या ४५८ वाटप केलेल्या रोपांपैकी प्रत्यक्षात २७९ म्हणजेच ६१% झाडे जगलेली आहेत. तर वाटप केलेल्या २०५ बांबू रोपांपैकी ३६ म्हणजेच १८% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत.

१२.४ नाशिक जिल्ह्यातील निवडलेल्या ८० कुटुंबांना २०२ कढीपत्ता रोपांचे वाटप केले होते. त्यापैकी १६२ म्हणजेच ८०% झाडे जगली. पपई रोपे ३०२ वाटप केली होती त्यापैकी २३३ म्हणजेच ७७% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. ग्लिरीसिडियाची ७०९० रोपे वाटप केली त्यापैकी ३७३३ म्हणजेच ५३% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. सागाच्या १०१३० वाटप केलेल्या रोपांपैकी ५९५० म्हणजेच ५९% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. तर वाटप केलेल्या ५८१५ बांबू रोपांपैकी ३००७ म्हणजेच ५२% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत.

१२.५ नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात निवडलेल्या १४ कुटुंबांना वाटप केलेल्या ६ कढीपत्ता रोपांपैकी एकही रोप जगले नाही. ग्लिरीसिडियाची २७५ रोपे वाटप केली त्यापैकी ३७ म्हणजेच १३% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. सागाच्या ६१० वाटप केलेल्या रोपांपैकी ९७ म्हणजेच १६% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. तर वाटप केलेल्या ६०० बांबू रोपांपैकी ३१ म्हणजेच ५% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत.

१२.६ यवतमाळ जिल्ह्यातील निवडलेल्या ९३ कुटुंबांना वाटप केलेले एकही कढीपत्ता रोप जगले नाही. पपईची ६ रोपे वाटप केली होती त्यापैकी २ म्हणजेच ३३% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. ग्लिरीसिडियाची १४७५ रोपे वाटप केली त्यापैकी २६५ म्हणजेच १८% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. सागाच्या ४०१० वाटप केलेल्या रोपांपैकी ११५७ म्हणजेच २९% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत. तर वाटप केलेल्या ३८१० बांबू रोपांपैकी ६६८ म्हणजेच १८% झाडे प्रत्यक्षात जगलेली आहेत.



सागवान रोपांची झालेली वाढ



सुबाभूळ रोपांची झालेली वाढ

## ४.५'लाभार्थ्यांच्या मालकीच्या ज़मिनीची उत्पादनक्षमता व शेती साधनात झालेली वाढ

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांच्या मालकीची शेती व शेती साधनातील लाभापूर्वीची व लाभानंतरची स्थिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. १३

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | एकूण जमीन (एकर) | | | | योजनेचा लाभ मिळाल्यानंतर शेती साधनात झालेली वाढ | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लाभापूर्वी | | लाभानंतर | | सिंचन व्यवस्था | | सुधारित बियाणे वापर | | उन्हाळी भाजीपाला | |
| | | | | पडीक जमीन | उत्पादन क्षम जमीन | पडीक जमीन | उत्पादन क्षम जमीन | होय | नाही | होय | नाही | होय | नाही |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ७१.५ | ११८ | २७ | १६२.५ | ५५ | ३ | ५५ | ३ | ५८ | ० |
| | | २) कर्जत | २० | ५९.५ | ३१.५ | ४५ | ४६ | १५ | ५ | २० | ० | २० | ० |
| | | एकूण जिल्हा | ७८ | १३१ | १४९.५ | ७२ | २०८.५ | ७० | ८ | ७५ | ३ | ७८ | ० |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | १८८ | १५४.५ | १४३ | १९९.५ | ३१ | ४६ | ५५ | २२ | ३२ | ४५ |
| | | एकूण जिल्हा | ७७ | १८८ | १५४.५ | १४३ | १९९.५ | ३१ | ४६ | ५५ | २२ | ३२ | ४५ |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | १२७.५ | १५४ | ७९ | २०२.५ | ४० | २ | ४२ | ० | ४२ | ० |
| | | २) सुरगाणा | ३८ | ५३ | ८९ | १६.५ | १२५.५ | ३२ | ६ | ३५ | ३ | ३३ | ५ |
| | | एकूण जिल्हा | ८० | १८०.५ | २४३ | ९५.५ | ३२८ | ७२ | ८ | ७७ | ३ | ७५ | ५ |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | १९.५ | ४५ | १० | ५४.५ | ४ | १० | १० | ४ | ४ | १० |
| | | एकूण जिल्हा | १४ | १९.५ | ४५ | १० | ५४.५ | ४ | १० | १० | ४ | ४ | १० |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | ११०.५ | ३२६ | १०४.५ | ३३२ | २५ | ४९ | ३४ | ४० | २० | ५४ |
| | | २) मारेगाव | १३ | २४ | ५२ | ८ | ६८ | ४ | ९ | १२ | १ | ७ | ६ |
| | | ३) झरी-जामणी | ६ | २.५ | २९ | ५ | २६.५ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| | | एकूण जिल्हा | ९३ | १३७ | ४०७ | ११७.५ | ४२६.५ | ३२ | ६१ | ४९ | ४४ | ३० | ६३ |
| | | एकूण एकंदर | ३४२ | ६५६ | ९९९ | ४३८ | १२१७ | २०९ | १३३ | २६६ | ७६ | २१९ | १२३ |

१३.१ वरील तक्त्यावरुन असे आढळून आले की, ३४२ लाभार्थ्यांकडील लाभापूर्वीची पडीक जमीन ६५६ एकर म्हणजेच ४०% इतकी होती तर लाभानंतर तिचे प्रमाण २६% एवढे झाले. तर लाभापूर्वी उत्पादनक्षम जमीन ९९९ एकर म्हणजेच ६०% इतकी होती, ती लाभानंतर १२१७ एकर म्हणजेच ७४% एवढी झाली.

१३.२ योजनेचा लाभ मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या सिंचन साधनात ६१%, सुधारीत बियाणे वापरात ७८% व उन्हाळी भाजीपाला लागवडीत ६४% वाढ झाल्याचे आढळून आले.

१३.३ रायगड जिल्ह्यातील ७८ लाभार्थ्यांकडील पडीक जमीन लाभापूर्वी ४७% होती तर लाभानंतर हेच प्रमाण २६% एवढे झाले. तसेच लाभापूर्वी उत्पादनक्षम जमीन ५३% होती व लाभानंतर ७४% झाल्याचे आढळून आले.

१३.४ योजनेचा लाभ घेतल्यानंतर रायगड जिल्ह्यातील लाभार्थ्यांची सिंचन व्यवस्था ९०%, सुधारीत बियाणे वापरणारे लाभार्थी ९६% व उन्हाळी भाजीपाल्याची लागवड करणारे लाभार्थी १००% एवढे झाले.

१३.५ पुणे जिल्ह्यातील ७७ लाभार्थ्यांकडे लाभापूर्वी ५५% एवढी पडीक जमीन होती तर लाभानंतर पडीक जमीनीचे प्रमाण ४२% एवढे झाले. उत्पादनक्षम जमीनीचे लाभापूर्वीचे प्रमाण ४५% होते तर लाभानंतर हेच प्रमाण ५८% एवढे झाले.

१३.६ पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाल्यानंतर सिंचन व्यवस्था ४०%, सुधारीत बियाणांचा वापर ७१%, व उन्हाळी भाजीपाला लागवडीचे प्रमाण ४२% एवढे झाले.

१३.७ नाशिक जिल्ह्यात एकूण ८० लाभार्थ्यांची पाहणी करण्यात आली. यापैकी ४३% लाभार्थ्यांकडे लाभापूर्वी पडीक जमीन होती, ती लाभानंतर २३% एवढी झाली. त्याचप्रमाणे उत्पादनक्षम जमीन ५७% लाभार्थ्यांकडे होती, तिचे प्रमाण वाढून लाभानंतर ७७% एवढे झाले.

१३.८ नाशिक जिल्ह्यात योजनेचा लाभ मिळाल्यानंतर ९०% लाभार्थी सिंचन व्यवस्था वापरत होते, ९६% लाभार्थी सुधारीत बियाणांचा तर ९४% लाभार्थी उन्हाळी भाजीपाल्याची लागवड करीत असल्याचे आढळून आले.

१३.९ नांदेड जिल्ह्यातील एकूण १४ लाभार्थींकडे लाभापूर्वी पडीक जमिनीचे प्रमाण ३०% होते व लाभानंतर हेच प्रमाण १६% एवढे झाले. उत्पादनक्षम जमिनीचे प्रमाण ७०% एवढे होते ते लाभानंतर ८४% एवढे झाले.

१३.१० लाभानंतर नांदेड जिल्ह्यातील २९% लाभार्थी सिंचन व्यवस्थेचा, ७१% लाभार्थी सुधारीत बियाणांचा वापर करीत होते, तर २९% लाभार्थी उन्हाळी भाजीपाल्याची लागवड करीत होते.

१३.११ यवतमाळ जिल्ह्यात एकूण ९३ लाभार्थ्यांची पाहणी करण्यात आली. पाहणी केलेल्या लाभार्थ्यांमध्ये लाभापूर्वी पडीक जमिनीचे प्रमाण २५% होते तर लाभानंतर हेच प्रमाण २२% एवढे झाले. त्याचप्रमाणे उत्पादनक्षम जमीनीचे लाभापूर्वीचे प्रमाण ७५% एवढे होते ते लाभानंतर ७८% एवढे झाले.

१३.१२ यवतमाळ जिल्ह्यात योजनेचा लाभ मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या शेती साधनाची स्थिती आढळून आली ती अशी - सिंचनव्यवस्था वापरणारे लाभार्थी - ३४%, सुधारीत बियाणांचा वापर करणारे लाभार्थी - ५३% तर उन्हाळी भाजीपाल्याची लागवड करणारे लाभार्थी ३२% एवढे होते.

यावरुन असे दिसून येते की, योजनेचा लाभ मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या उत्पादनक्षम जमिनीत वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच लाभार्थ्यांच्या शेतीसाधनात देखील वाढ झाल्याचे दिसून येते.

## ४.६ उत्पन्नविषयक माहिती

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांची उत्पन्नविषयक माहिती खालील तक्त्यातून अधिक स्पष्ट होते.

### तक्ता क्र. १४

(रुपये हजारात)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | उत्पन्न | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लाभापूर्वी | | | | लाभानंतर | | | |
| | | | | ० ते २० | २० ते ४० | ४० ते ६० | ६० पेक्षा जास्त | ० ते २० | २० ते ४० | ४० ते ६० | ६० पेक्षा जास्त |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ३६ | १९ | ३ | ० | ३ | ३२ | १७ | ६ |
| | | २) कर्जत | २० | १४ | ६ | ० | ० | ३ | १२ | ४ | १ |
| | | **एकूण जिल्हा** | **७८** | **५०** | **२५** | **३** | **०** | **६** | **४४** | **२१** | **७** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | ५१ | २५ | १ | ० | ८ | ६१ | ७ | १ |
| | | **एकूण जिल्हा** | **७७** | **५१** | **२५** | **१** | **०** | **८** | **६१** | **७** | **१** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | ४ | ३८ | ० | ० | ० | ७ | ३४ | १ |
| | | २) सुरगाणा | ३८ | ३७ | १ | ० | ० | ५ | २२ | ६ | ५ |
| | | **एकूण जिल्हा** | **८०** | **४१** | **३९** | **०** | **०** | **५** | **२९** | **४०** | **६** |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ९ | ४ | ० | १ | १ | १० | २ | १ |
| | | **एकूण जिल्हा** | **१४** | **९** | **४** | **०** | **१** | **१** | **१०** | **२** | **१** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | ३८ | २५ | ८ | ३ | ८ | ४२ | १९ | ५ |
| | | २) मारेगाव | १३ | ९ | ४ | ० | ० | २ | ११ | ० | ० |
| | | ३)झरी-जामणी | ६ | ४ | २ | ० | ० | ० | ४ | २ | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **९३** | **५१** | **३१** | **८** | **३** | **१०** | **५७** | **२१** | **५** |
| | | **एकूण एकंदर** | **३४२** | **२०२** | **१२४** | **१२** | **४** | **३०** | **२०१** | **९१** | **२०** |

१४.१ पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांचे योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीचे उत्पन्न रुपये ० ते २०,०००/- पर्यंत ५९%, रुपये २०,०००/- ते ४०,०००/- पर्यंत ३६%, रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- पर्यंत ४% व रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त १% याप्रमाणे होते. तर याच लाभार्थ्यांना योजनेचा लाभ झाल्यानंतरचे उत्पन्न रुपये ० ते २०,०००/- पर्यंत ९%, रुपये २०,०००/- ते ४०,०००/- पर्यंत ५९%, रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- पर्यंत २७% व रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त ५% एवढे झाले.

१४.२ रायगड जिल्ह्यातील ६४% लाभार्थी लाभापूर्वी व ८% लाभार्थी लाभानंतर रुपये ० ते २०,०००/- पर्यंत या गटात येतात. वार्षिक उत्पन्न रुपये २०,०००/- ते ४०,०००/- या गटात ३२ % लाभार्थी लाभापूर्वी व ५६% लाभार्थी लाभानंतर मोडतात. लाभापूर्वी ३ लाभार्थी व लाभानंतर २१ लाभार्थी

वार्षिक उत्पन्न रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- या गटात मोडतात. वार्षिक उत्पन्न रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त या गटात लाभापूर्वी एकही लाभार्थी नव्हता तर लाभानंतर ७ लाभार्थ्यांचे उत्पन्न रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त झालेले आढळले.

१४.३ पुणे जिल्ह्यातील ६६% लाभार्थी लाभापूर्वी व १०% लाभार्थी लाभानंतर वार्षिक उत्पन्न रुपये ० ते २०,०००/- या गटात मोडतात. वार्षिक उत्पन्न रुपये २०,०००/- ते ४०,०००/- या गटात ३२ % लाभार्थी लाभापूर्वी व ७९% लाभार्थी लाभानंतर मोडतात. लाभापूर्वी १ लाभार्थी व लाभानंतर ७ लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- असल्याचे दिसते. वार्षिक उत्पन्न रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त या गटात लाभापूर्वी एकही लाभार्थी नव्हता तर लाभानंतर १ लाभार्थी या गटात असल्याचे आढळले.

१४.४ नाशिक जिल्ह्यातील ५१% लाभार्थी लाभापूर्वी व ६% लाभार्थी लाभानंतर वार्षिक उत्पन्न रुपये ० ते २०,०००/- या गटात असल्याचे आढळते. वार्षिक उत्पन्न रुपये २०,०००/- ते ४०,०००/- या गटात ४९% लाभार्थी लाभापूर्वी व ३६% लाभार्थी लाभानंतर होते. लाभापूर्वी एकही लाभार्थी वार्षिक उत्पन्न रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- व ६०,०००/- पेक्षा जास्त या दोन्ही गटात नव्हता. तर लाभानंतर अनुक्रमे ४० व ६ लाभार्थी या दोन्ही गटात असल्याचे दिसते.

१४.५ नांदेड जिल्ह्यातील ६४% लाभार्थी लाभापूर्वी व ७% लाभार्थी लाभानंतर वार्षिक उत्पन्न रुपये ० ते २०,०००/- या गटात असल्याचे आढळते. वार्षिक उत्पन्न रुपये २०,०००/- ते ४०,०००/- या गटात २८% लाभार्थी लाभापूर्वी व ७१% लाभार्थी लाभानंतर होते. लाभापूर्वी एकही लाभार्थी वार्षिक उत्पन्न रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- या गटात नसल्याचे आढळते. तर लाभानंतर २ लाभार्थी असल्याचे आढळते. वार्षिक उत्पन्न रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त या गटात लाभापूर्वी व लाभानंतर प्रत्येकी १ लाभार्थी असल्याचे आढळते.

१४.६ यवतमाळ जिल्ह्यात ५५% लाभार्थी लाभापूर्वी व ११% लाभार्थी लाभानंतर वार्षिक उत्पन्न रुपये ० ते २०,०००/- या गटात असल्याचे आढळते. वार्षिक उत्पन्न रुपये २०,०००/- ते ४०,०००/- या गटात लाभापूर्वी ३३% व लाभानंतर ६१% लाभार्थी असल्याचे आढळते. अनुक्रमे ८ व २१ लाभापूर्वी व लाभानंतर वार्षिक उत्पन्न रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- या गटात असल्याचे दिसून येते. तसेच अनुक्रमे ३ व ५ लाभार्थी लाभापूर्वी व लाभानंतर वार्षिक उत्पन्न रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त या गटात असल्याचे दिसून येते.

१४.७ वर निर्देशित केलेल्या तक्त्याचे अवलोकन केले असता -

अ) लाभापूर्वी रुपये ० ते २०,०००/- च्या आतील उत्पन्न गटामध्ये २०२ लाभार्थी होते. या लाभार्थ्यांपैकी लाभानंतर रुपये ० ते २०,०००/- या उत्पन्न गटामध्ये फक्त ३० लाभार्थी असल्याचे दिसून आले. म्हणजेच लाभानंतर १७२ लाभार्थ्यांचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसून आले.

ब) रुपये २०,०००/- ते ४०,०००/- या उत्पन्न गटात लाभापूर्वी १२४ लाभार्थी होते तर लाभानंतर २०१ लाभार्थी असल्याचे दिसून आले. म्हणजेच ७७ लाभार्थ्यांचे उत्पन्न वाढल्याचे दिसून येते.

क)' रुपये ४०,०००/- ते ६०,०००/- या उत्पन्न गटात लाभापूर्वी फक्त १२ लाभार्थी होते तर लाभानंतर याच उत्पन्न गटात ९१ लाभार्थी असल्याचे दिसून आले. म्हणजेच ७९ लाभार्थ्यांचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसून आले.

ड) रुपये ६०,०००/- पेक्षा जास्त या उत्पन्न गटात लाभापूर्वी फक्त ४ लाभार्थी होते तर लाभानंतर २० लाभार्थी असल्याचे दिसून आले. म्हणजेच १६ लाभार्थ्यांचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसून आले.

वरील 'अ' ते 'ड' चे अवलोकन केले असता लाभापूर्वीच्या लाभार्थ्यांच्या संख्येमध्ये लाभानंतर वाढ होत असल्याचे दिसून आले.



**लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी व माहितीचे संकलन**



**लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी व माहितीचे संकलन**

## ४.७ स्थलांतर व योजनेचा फायदा याबाबतची माहिती

पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांचे स्थलांतर व योजनेचा फायदा याबाबतची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

### तक्ता क्र. १५

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | स्थलांतर | | | | योजनेचा फायदा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कार्यक्रमांत सहभागापूर्वी | | कार्यक्रमांत सहभागानंतर | | होय | नाही |
| | | | | होय | नाही | होय | नाही | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. | रायगड | १) पेण | ५८ | ५१ | ७ | ४ | ५४ | ५८ | ० |
| | | २) कर्जत | २० | १६ | ४ | ० | २० | २० | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **७८** | **६७** | **११** | **४** | **७४** | **७८** | **०** |
| २. | पुणे | १) आंबेगाव | ७७ | ५४ | २३ | ३ | ७४ | ६८ | ९ |
| | | **एकूण जिल्हा** | **७७** | **५४** | **२३** | **३** | **७४** | **६८** | **९** |
| ३. | नाशिक | १) त्र्यंबकेश्वर | ४२ | ३४ | ८ | २ | ४० | ४२ | ० |
| | | २)सुरगाणा | ३८ | ३५ | ३ | ४ | ३४ | ३८ | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **८०** | **६९** | **११** | **६** | **७४** | **८०** | **०** |
| ४. | नांदेड | १) किनवट | १४ | ७ | ७ | २ | १२ | १४ | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **१४** | **७** | **७** | **२** | **१२** | **१४** | **०** |
| ५. | यवतमाळ | १) केळापूर | ७४ | ४६ | २८ | ८ | ६६ | ७१ | ३ |
| | | २) मारेगाव | १३ | ६ | ७ | १ | १२ | १३ | ० |
| | | ३) झरी-जामणी | ६ | २ | ४ | ० | ६ | ६ | ० |
| | | **एकूण जिल्हा** | **९३** | **५४** | **३९** | **९** | **८४** | **९०** | **३** |
| | | **एकूण एकंदर** | **३४२** | **२५१** | **९१** | **२४** | **३१८** | **३३०** | **१२** |

१५.१ पाहणी केलेल्या ३४२ लाभार्थ्यांपैकी ७३% लाभार्थ्यांचे कार्यक्रमात सहभागी होण्यापूर्वी स्थलांतर होत होते. तर कार्यक्रमातील सहभागानंतर फक्त ७ % लाभार्थ्यांचे स्थलांतर झालेले दिसून येते. तसेच ९६% लोकांना या योजनेचा फायदा झाल्याचे आढळते.

१५.२ रायगड जिल्ह्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी ८६% लाभार्थी कार्यक्रमात सहभागापूर्वी स्थलांतर करीत होते तर कार्यक्रमातील सहभागानंतर फक्त ५% लाभार्थ्यांचे स्थलांतर झाल्याचे आढळते. या जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांना योजनेचा फायदा झाल्याचे दिसून येते.पुणे जिल्ह्यातील ७०% लाभार्थी योजनेचा लाभ घेण्याअगोदर स्थलांतर करीत होते तर योजनेचा लाभ घेतल्यानंतर फक्त ४% लोक स्थलांतर करीत होते. ८८% लाभार्थ्यांना योजनेचा फायदा झाल्याचे दिसते.

१५.३ नाशिक जिल्ह्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी ८६% लाभार्थी कार्यक्रमांत सहभागापूर्वी स्थलांतर करीत होते तर कार्यक्रमातील सहभागानंतर फक्त ८% लाभार्थ्यांचे स्थलांतर होत असल्याचे आढळले. तसेच या योजनेचा फायदा झाल्याचे सर्व लाभार्थ्यांनी सांगितले.

१५.४ नांदेड जिल्ह्यातील निम्मे लाभार्थी कार्यक्रमात सहभागापूर्वी स्थलांतर करीत होते तर कार्यक्रमात सहभागानंतर हेच प्रमाण १४% वर आले. त्याचप्रमाणे ही योजना राबविणे सर्व लाभार्थ्यांना फायदेशीर ठरले.

१५.५ यवतमाळ जिल्ह्यातील ५८% लाभार्थ्यांचे कार्यक्रमात सहभागापूर्वी स्थलांतर होत होते. कार्यक्रमात सहभागानंतर १०% लोकांचे स्थलांतर झाल्याचे दिसते. तसेच ९७% लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा झाल्याचे दिसते.

१५.६ रायगड, नाशिक व नांदेड जिल्ह्यातील १००% लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा झाल्याचे दिसते.

१५.७ या योजनेचा मुख्य फायदा असा दिसतो की, लाभार्थ्यांचे स्थलांतर रोखण्यात मोठी मदत झाली तसेच त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढून त्यांना स्थानिक ठिकाणीच रोजगार उपलब्ध होण्यास मदत झाली.



**लाभार्थ्यांकडून प्रत्यक्ष माहिती प्रपत्रे भरून घेताना अधिकारी व कर्मचारीवृंद**

# प्रकरण क्रमांक ५

## निष्कर्ष

आदिवासी समाज शेतीचे अल्प उत्पन्न, नैसर्गिक साधनसंपत्तीचा होणारा ऱ्हास, पारंपरिक उत्पन्न साधनात झालेली घट, कुपोषण, अंधश्रद्धा, संधीचा अभाव व स्थलांतर या दुष्टचक्रात सापडला आहे. सुमारे ८५% आदिवासींचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे.

<u>मुख्य उद्देश</u> :- वाडी कार्यक्रम हा शेती पद्धतीवर अवलंबून असून त्यामध्ये फळबाग लागवड, जंगली झाडे व सुधारीत शेती पद्धतीचा अवलंब, आदिवासी शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून नगदी पिके व भाजीपाला लागवड करण्यास प्रवृत्त करणे, त्याद्वारे आदिवासी शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाची हमी व कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध करून देणे, हे प्रमुख उद्देश वाडी व सुधारीत शेती कार्यक्रमात अंतर्भूत असल्याचे दिसून आले.

<u>गावांची व लाभार्थी निवड पद्धत</u> :- प्राथमिक स्तरावर वाडी कार्यक्रमाची सविस्तर माहिती आदिवासी गावांतील सर्व कुटुंबांना दिल्यानंतर वाडी कार्यक्रमात सहभागी होण्याचे इच्छूक असलेल्या कुटुंबांना वाडीद्वारे परिवर्तन घडत असलेल्या आदिवासी गावांत अभ्यास दौरा, गाव पातळीवर बैठका, प्रशिक्षण, वाडी आखणी, खड्डे खणणे, खड्डे भरणे, झाडांची लागवड, जैविक कुंपण करणे, वेळोवेळी मार्गदर्शन इत्यादी कामे बायफ - मित्र संस्थेचे प्रकल्प अधिकारी / कर्मचारी यांनी केल्याचे प्रकर्षाने आढळून आले.

लाभार्थ्यांची निवड करताना तो आदिम जमातीच्या गावांचा समावेश करावा. तसेच तो अनुसूचित जमातीचा भूमीधारक व त्या गावाचा रहिवासी असावा. फळबाग लागवड असलेल्या जमिनी विकता येणार नसल्याचे मान्य असल्याचे संमतीपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात आल्याचे पाहणीत आढळून आले.

<u>कार्यप्रणाली</u> :- वाडी कार्यक्रम राबविताना ८ ते १० वाडी धारकांचा एक गट याप्रमाणे गटांची स्थापना केली आहे. या गटाला वाडी तुकडी असे संबोधण्यात येते. वाडी तुकडीची सभा दर महिन्याला होत होती असे पाहणी केलेल्या गावांतील लाभार्थ्यांनी सांगीतले. या सभेमध्ये मित्र संस्थेचे अधिकारी / कर्मचारी यांनी वाडी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे.

वाडी व सुधारीत शेती कार्यक्रमामध्ये विविध प्रकारची कामे केल्याचे आढळून आले -

१) खड्डे खणणे व भरणे.

२) जैविक कुंपण करणे.

३) योग्य हवामानानुसार व उत्पन्न घेण्याच्या क्षमतेनुसार जंगली झाडे व फळझाडांची लागवड करणे.

४) बांध बंदिस्तीची कामे ( चर, ओटे, बांध इ.)

५) जलस्त्रोत विकासाची कामे (पाईप वाटप, पाणी वाहतुकीसाठी पाण्याचा ड्रम व चाकजोडीचे वाटप इ.), फळझाडांना सिंचन सुविधा मिळण्याकरीता आवश्यक ते सर्व उपाय केल्याचे पाहणीत दिसून आले.

६) नवीन तंत्रज्ञानाचा वापर व सुधारीत शेती पद्धतीचा अवलंब करून लाभार्थ्यांनी आंतरपिके व भाजीपाल्याची लागवड केली असल्याचे दिसून आले.

७) वाडी कार्यक्रमातील आदिवासी लाभार्थ्यांना वेळोवेळी उद्भवणाऱ्या समस्यांच्या सोडवणूकीसाठी बायफ - मित्र संस्थेचे अधिकारी / कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतल्याचे पाहणीत आढळून आले.

**या संस्थेने केलेल्या पहाणी मध्ये खालील बाबी आढळून आल्यात.**

i) शेतकऱ्यांची पडीक शेतजमीन लागवडीखाली येण्यास मदत झाली.

ii) लाभार्थ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली.

iii) लाभार्थ्यांना सुधारीत शेती पद्धतींची माहिती झाली.

iv) लाभार्थ्यांना आंतरपिकांमध्ये भाजीपाला लागवड केल्याने रोख पैसे मिळू लागले.

v) सहकारी पद्धतीने लागवड होत असल्याने परस्परांमध्ये सहकार्याची भावना वाढली.

vi) शेतकऱ्यांचे स्थलांतराचे प्रमाण बरेच कमी झाले.

vii) शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळू लागल्यामुळे राहणीमान सुधारले.

vii) शेतकऱ्यांना फळफळावळ व पालेभाज्यांच्या कुटुंबामधील वापरामुळे आरोग्यमान सुधारले.

# प्रकरण क्रमांक - ६

## योजना राबविण्यातील अडचणी व उपाययोजना

**सर्वेक्षणाच्या वेळी आढळून आलेल्या अडचणी :-**

१) वाडी कार्यक्रम राबविण्यात आलेली बहुतांश जमीन ही पडीत डोंगरउताराची खडकाळ व ओबडधोबड आहे. त्यामुळे तेथे जमीन तयार करताना फार मेहनत घ्यावी लागते.

२) डोंगरउताराची जमीन असल्याने पावसाचे पाणी वाहून जाण्याचे प्रमाण जास्त आहे. कृषी योजनेची जलसंधारणाची कामे उदा. बंडिंग व जमीन सुधारण्याची कामे कमी प्रमाणात झालेली आहेत.

३) बहुतेक जमीनींचा ७/१२ हा लाभार्थ्याच्या नावावर नसल्यामुळे इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यास अडचणी आल्याचे दिसून आले.

४) पावसाचे प्रमाण पुरेसे असले तरी जलसंधारण नाही. तसेच बंधारे वगैरे नसल्याने सिंचन नाही. त्यामुळे फळझाडांना पुरेसे पाणी देता येत नाही व झाडे कमी प्रमाणात जगतात.

५) लघुपाटबंधारे अथवा उपसा सिंचन योजना कमी प्रमाणात राबविलेली आहे.

६) डोंगरउताराची जमीन व भौगोलिक दुर्गम परिस्थिती यामुळे लाभधारकाला होणारा फायदा कमी झाला आहे.

**उपाययोजना / शिफारशी :-**

१) जन उत्कर्ष - वाडी कार्यक्रम बायफ विकास अनुसंधान प्रतिष्ठान, पुणे संस्थेशी संलग्न असणाऱ्या महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ट्रान्सफर फॉर रुरल एरियाज (मित्र), नाशिक संस्थेने व्यापक स्वरुपात कामाची आखणी व नियोजनबद्ध अंमलबजावणी केली आहे, असे पाहणी सर्वेक्षणात आढळून आले.

२) जत्त उत्कर्ष - वाडी कार्यक्रम व्यापक स्वरुपात २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांचे कार्यक्षेत्रात पुनश्च कार्यक्रम राबविण्यात यावा.

३) वाडी कार्यक्रमाची आखणी करताना आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे अधिपत्याखाली अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर व संबंधित कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी यांचे सल्ल्याने वाडी कार्यक्रम लाभार्थीची निवड करण्यात यावी.

४) वाडी कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना पहिल्या टप्प्यापासून ते शेवटच्या टप्प्यापर्यंत संयुक्तपणे मित्र संस्थेचे अधिकारी व प्रकल्प अधिकारी यांनी वर्षातून किमान ३ वेळा निरीक्षणे करावी, लाभार्थींच्या अडी-अडचणी समजावून घेऊन प्रत्येक टप्प्यावर पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

५) वाडी कार्यक्रमाची नैसर्गिक पाण्याचा स्रोत व सिंचन व्यवस्था असल्यास सक्षमपणे अंमलबजावणी करता येईल. डोंगर उतार व पडीक जमीनीवर सिंचन सुविधा नसल्यास हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात अडचणी येतात. जमीन सपाटीकरणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. त्यामुळे सर्वप्रथम जिल्हानिहाय भौगोलिक परिस्थिती व सिंचन सुविधेचा विचार करून हा कार्यक्रम राबविण्यात यावा.

६) वाडी कार्यक्रमासोबतच इतर शासकीय योजना जसे शेळीपालन, कुक्कुट पालन व कुटीर उद्योग यासारख्या योजनांची जोड देऊन आदिवासी कुटुंबांना शाश्वत उत्पादनाची हमी मिळेल, अशी खात्री करून घ्यावी.

७) वाडी कार्यक्रमामध्ये विविध प्रकारची कामे केली जातात. जसे फळझाडे व जंगली झाडे यांची लागवड करताना खड्डे खणणे व भरणे, जैविक कुंपण करणे, बांध बंदिस्ती व सुधारीत शेती अंतर्गत आंतर पिके, सिंचनाची सोय इ. बाबत जिल्हानिहाय हवामानानुसार व उत्पन्न देण्याच्या क्षमतेनुसार व लाभार्थीची क्रयशक्ती विचारात घेऊनच वाडी कार्यक्रमात नियोजनबद्ध कामाची आखणी करावी.

८) वाडी कार्यक्रमांतर्गत सुधारीत शेती पद्धतीचा अवलंब करताना नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून नगदी पिके व भाजीपाला लागवड करण्यास प्रवृत्त करण्यासाठी शेतीतज्ज्ञांचे मार्गदर्शन वेळोवेळी होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे लाभार्थींचे उत्पादनात वाढ होईल, असे पहावे.

९) वाडी कार्यक्रमातील लाभार्थ्यांच्या गावांमध्ये बचत गटांच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती व त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे.

१०) वाडी कार्यक्रम अंतर्गत जे लाभार्थी सुधारीत शेती पद्धतीचा अवलंब करतात, त्या लाभार्थींना उत्कृष्ट जातीचे बियाणे, खते, पीक संरक्षण इ. बाबत सखोल व वेळोवेळी माहिती व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

११) लाभार्थ्यांच्या उत्पन्नाच्या स्रोतांमध्ये वाढ झाल्यास गावांतच रोजगाराच्या संधी निर्माण होतील व स्थलांतरात घट होईल, त्याकरीता दुरदृष्टीने नियोजन होणे आवश्यक आहे.

१२) फळझाडांचे वाटप करताना जिल्हानिहाय जमिनीची पत, पाण्याची उपलब्धता व हवामानानुसार करण्यात यावे.

१३) शेतकऱ्यांच्या शेतातील तयार झालेल्या फळांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच रोपांची निगा त्याचबरोबर त्यापासून मिळणारे फळांचे उत्पादनावर प्रक्रिया करून विकल्यास मिळणारा फायदा, अर्थार्जन अधिक मिळू शकेल.

१४) मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून असलेल्या व रानावनात राहणारा आदिवासी त्याला ज्यामध्ये आवड आहे अशा योजना राबविल्यास नक्कीच आदिवासींचा उत्कर्ष होईल. तरी सदरील योजना नियोजन पूर्वक पुन्हा राबविण्यात यावी.

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६





मुद्रणस्थळ : येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे - ६